मराठी पुस्तके

# दुष्काळविषयक विनंतिपत्रक

## महात्मा जोतिबा फुले

**12/27/2013**

टंकन: हर्षला रामाणे

मुद्रितशोधन : आशा दादुडे

## दुष्काळविषयक विनंतिपत्रक

मेहेरबान पुणे, मुंबई वगैरे ठिकाणचे सभासद यांस वि. वि. समाजाचे हुकुमाकरून आपणांस विनंतिपूर्वक असें कळविण्यांत येते कीं, समाजाचे मार्फत "व्हिक्टोरिया बालाश्रम" स्थापन केलें आहे. घरांत दुष्काळपीडीत लोक आपलीं मुलें सोडून जाऊं लागले आहेत व त्याप्रमाणें इंदापूर, मिरज व तासगांवकडील ब्राह्मणजात खेरीजकरून बाकी सर्व जातींतील कित्येक अनाथ लोक आपलीं मुलेंबाळें घेऊन जमले आहेत. कधीं कधीं दोन दोन तीन तीन दिवसांचे उपवास काढून त्यांचीं हाडें मात्र उरलीं आहेत. शिवाय त्यांचे वस्त्रावांचून इतके हाल झाले आहेत कीं, त्यांचे येथें इत्थंभूत वर्णन करण्यास मला दु:ख वाटतें. यावरून आपण सर्व सभासदांनीं व इतर दयावंत गृहस्थांनी कृपाळू होऊन, आपल्या शक्तीनुसार कांहीं ना कांहीं तरी, ही जाहिरात पाहतांच, मदत पाठविण्याची त्वरा केल्यास आपण आपलें कर्तव्यकर्म अशा वेळीं बजावल्याचें श्रेय होणार आहे.

ता. १७ माहे मे, सन १८७७ इ.

आपला सेवक,
**जोतीराव गोविंदराव फुले.**

स. शो. स. चिटणीस.
(ज्ञानप्रकाश, २४ मे १८७७)

**–समाप्त–**